**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

सौ.मंजिरी सुरेश कुलकर्णी
बंगला नं.२७, गृहशिल्प हौसिंग सोसायटी,
बागरोझा, दिल्लीगेट, साताळकर हॉस्पिटल जवळ,
अहमदनगर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव,**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड,
पुणे-७

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड,
पुणे-७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९१४/पुणे + २९१५/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१) शैक्षणिक वर्ष २००७-०८ एम.एड.(जनरल) या परीक्षेसाठीच्या डॉ.हेडगेवार शिक्षण प्रतिष्ठान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पार्ट-२ मधील २०३ व २०४ या विषयाचे व पार्ट-३ मधील ३०१ व ३०२ या विषयाचे अंतर्गत व बहि:स्थ असे स्वतंत्र गुण मिळावेत.<br>२) एम.एड्. चा प्रबंध हा विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे असताना बहि:स्थ विद्यार्थ्याला कमी मार्क कसे दिले, याबाबतचा खुलासा. | |

## विवेचन

अपीलकर्त्या सौ.मंजिरी सुरेश कुलकर्णी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या दोन्ही अपिलांचा समावेश दि.४/०४/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमां' त करण्यात आला होता. 'अपीलकर्त्या सौ.कुलकर्णी यांना त्यांच्या मूळ माहिती-मागणी अर्जाच्या अनुषंगाने विद्यापीठ कार्यालयाकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती देण्यात आलेली आहे. त्यांनी अंतर्गत व बहि:स्थच्या गुणांबाबतची मागणी केलेली आहे. तथापि विद्यापीठाकडे एकत्रित गुण प्राप्त होत असल्याने स्वतंत्र गुणांबाबतची माहिती विद्यापीठ कार्यालयात उपलब्ध नसल्याने अपीलकर्त्यास वेगवेगळे / स्वंतत्रपणे गुण देता आलेले नाहीत. तसेच एम.एड्.(जनरल) भाग ३ मधील आसन क्र.३९१ चे ५० पैकीचे गुण संबंधित प्राचार्यांच्या स्वाक्षरीने विद्यापीठ कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. तेच गुण अपीलकर्त्यास देण्यात आलेले आहेत', असे जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, श्रीमती अरुणा चव्हाण यांनी प्रपत्रात पूरक कागदपत्रांसह नमूद केले आहे. तसेच प्रस्तुत दोन्ही अपिलांप्रकरणी जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, व अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' तील प्रपत्रात अपीलकर्त्यांनी केलेली तक्रार (महाविद्यालयातील प्राचार्यांचा हलगर्जीपणा इ.) व त्याची शहानिशा हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा अंतर्गत निर्णयाचा विषय नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

वरील दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 18 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| श्री. बंडू वाघू ठाकर<br>मु. ठाकुरसाई, पो. पवनानगर, ता. मावळ, जि. पुणे | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **जन माहिती अधिकारी तथा** | ग्रामसेवक, ग्रामपंचायत ठाकुरसाई,<br>पो.पवनानगर, ता. मावळ, जि. पुणे | उत्तरवादी |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मावळ<br>जि. पुणे | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | २९२/२०१०/पुणे |
| २ | **सुनावणीची तारीख** | २०.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. बंडू वाघू ठाकर<br>मु. ठाकुरसाई, पो. पवनानगर, ता. मावळ, जि. पुणे |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | ग्रामसेवक, ग्रामपंचायत ठाकुरसाई,<br>पो.पवनानगर, ता. मावळ, जि. पुणे<br>श्री. जगन्नाथ बाबा शिदोरे |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मावळ<br>जि. पुणे श्रीमती दिपाली एस. पवार |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

तंटा मुक्ती समितीच्या अध्यक्षांना कमी करण्याचा ठराव ग्रामसभेने केला, त्याची प्रत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, ठाकुरसाई, पो. पवनानगर, ता. मावळ जाणीवपूर्वक देत नाहीत. ठराव झाला नसल्याचे खोटे उत्तर जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,

कासारसाई, ता. मावळ यांनी दिले आहे. त्याची शहानिशा होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. बंडू वाघू ठाकर यांनी केले.

अशा स्वरूपाचा ठराव झालेला नाही, ही वस्तुस्थिती असून तसे उत्तर दिले आहे असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपचायत, ठाकुरसाई, ता. मावळ श्री. जगन्नाथ बाबा शिदोरे व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मावळ श्रीमती दिपाली एस. पवार यांनी केले. नसलेल्या अभिलेखाच्या अनुषंगाने घटनेची शहानिशा करणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** 23 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. मुरलीधर गेनू शेवकरी
बी-२४, जाधव पार्क,
महादेव मंदिराजवळ,
आकुर्डी, पुणे-३५

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
जुन्नर उपविभाग, खेड,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय खेड,
जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९३५/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८/०५/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री. मुरलीधर गेनू शेवकरी<br>बी-२४, जाधव पार्क,<br>महादेव मंदिराजवळ,<br>आकुर्डी, पुणे-३५ | |

| | | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,**<br>तहसील कार्यालय खेड,<br>जि.पुणे श्रीमती रोहिणी आखाडे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१/०७/२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८/११/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** फेरफार क्र. ६२४ चा अंमल ७/१२ अभिलेखात देण्यासंदर्भात दि.२१/०७/२००८ रोजी दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबतचा तपशील | |

## विवेचन

'मूळ अर्जात मागणी केलेली माहिती मला उपलब्ध करुन दिलेली आहे. याबाबत माझी काहीही तक्रार नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.मुरलीधर गेनू शेवकरी यांनी दि.३/०६/२०१० रोजी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 22 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेंद्र रामचंद्र इंगवले
गिताई निवास, राहुल निवास, राहुल चेंबर्स,
१४, एरंडवणा, कर्वे रोड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, हवेली, ता.हवेली, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, हवेली, ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१३८ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, हवेली, ता.हवेली, जि.पुणे श्री.संदेश शिर्के

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, हवेली, ता.हवेली, जि.पुणे श्री.जगदीश निंबाळकर

| | |
|---|---|
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

फेरफाराच्या व वहिवाट हक्क कागदपत्रांच्या नकला अपीलकर्ता श्री.राजेंद्र रामचंद्र इंगवले यांनी दि.१.११.२००८ च्या अर्जान्वये मागितल्या होत्या. अभिलेख शाखेकडे संपर्क साधून योग्य ते शुल्क भरावे, तात्काळ नकला देण्याची व्यवस्था करण्यात येईल, असे दि.११.११.२००८ रोजी त्यांना कळविले. त्यानंतर त्यांनी संपर्क साधलेला नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, ता.हवेली, जि.पुणे श्री.जगदीश निंबाळकर यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह केले. माहिती उपलब्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. हे लक्षात घेता योग्य व पूर्ण माहिती न मिळाल्याची अपीलकर्त्याची अपील अर्जातील तक्रार रास्त ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिलकुमार बावधनकर
द्वारा चोपडे एजन्सीज अँड कन्सल्टसीज,
हिरामण लांडे बिल्डिंग, मुंबई-पुणे रोड,
कासारवाडी, पुणे-३४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक,**
सहकारी संस्था (वित्त), महाराष्ट्र राज्य,
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,**
(नागरी बँका), महाराष्ट्र राज्य,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९४९/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य यांनी दि.२२/०७/२००८ व दि.२५/०७/२००८ रोजी दिलेल्या आदेशानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीबाबतचा सविस्तर तपशील | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. सुनिलकुमार बावधनकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन त्यांच्या माहिती-मागणी अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था (नागरी बँका), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेले उत्तर व

अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था (वित्त), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा निर्णय योग्य असून तो कायम करण्यात येत आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 18 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| श्री. विष्णू शंकरराव कसबे<br>रा. घोरपडे पेठ, म्युनिसिपल कॉलनी क्र. ८/३, रूम नं. ६४,<br>सेंट्रल फायर ब्रिगेड समोर, पुणे-४११ ०४२ | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **जन माहिती अधिकारी तथा** | जिल्हाधिकारी पुणे यांचे चिटणीस,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | उत्तरवादी |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे<br>जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | २९५ / २०१०/ पुणे |
| २ | **सुनावणीची तारीख** | १९.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. विष्णू शंकरराव कसबे<br>रा. घोरपडे पेठ, म्युनिसिपल कॉलनी क्र. ८/३, रूम नं. ६४, सेंट्रल फायर ब्रिगेड समोर, पुणे-४११ ०४२ |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | जिल्हाधिकारी पुणे यांचे चिटणीस,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे<br>श्री. संजीव ना. देशमुख |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे<br>जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. अनिल पवार |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सन १९९८ ते २००९ या काळात गृहनिर्माण संस्था, शिक्षण संस्था, सामाजिक संस्था आदींना दिलेल्या शासकीय जमिनीची माहिती, संबंधित संस्थांचे ७/१२ उतारे, प्रपत्रके आदींसह सविस्तर माहिती

आपण जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे यांचे चिटणीस यांच्याकडे मागितली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ मध्ये नमूद केलेल्या माहितीच्या व्याख्येनुसार संबंधित माहिती पुरविता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांनी तो निर्णय कायम केला. माहिती संकलित करून मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. विष्णु शंकरराव कसबे यांनी केली.

श्री. कसबे यांनी ११ वर्षांच्या काळातील विस्तृत माहिती सरसकट व ढोबळ स्वरूपात मागितली आहे. संकलित स्वरूपात अशी माहिती नसते व संकंलित करून देणे शक्य नाही. विशिष्ट संस्थेबाबतचा तपशील नमूद केल्यास माहिती पुरविता येईल, असे त्यांना कळविले. सन २००६ पासूनच्या शासकीय जमीन वाटपाबाबतचे रजिस्टर तपासून त्यातील आवश्यक असलेली माहिती त्यांनी नमूद केल्यास त्यांना देता येईल, असे त्यांना कळविले. परंतु त्यांनी ते मान्य केले नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. संजीव ना. देशमुख व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे श्री. अनिल पवार यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. विशिष्ट संस्थेबाबतची माहिती मागण्याचा अथवा जमीन वाटप रजिस्टरवरून माहिती उपलब्ध करुन घेण्याचा मार्ग अपीलकर्त्यास उपलब्ध आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
दि. 23 JUN 2010

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिलकुमार बावधनकर
हिरामण लांडे बिल्डिंग, कासारवाडी,
मुंबई पुणे रोड, पुणे-३४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी,**
तहसील कर्यालय आवार, हजेरी बंगला,
सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक,**
ता.खंडाळा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९५०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ऑगस्ट २००७ ते ऑगस्ट २००८ या कालावधीत दुय्यम निबंधक, खंडाळा या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील दस्ताऐवज करुन देणार /घेणार, पॉवर ऑफ ॲट्रनी, साठेखत, खरेदीखत इ. छायाप्रती व नावे व पत्यांसह विस्तृत तपशील | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. सुनिलकुमार बावधनकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक,

ता.खंडाळा, जि.सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी, सातारा यांनी दिलेले उत्तर व केलेली कार्यवाही योग्य आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
दि :- 18 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| श्री. मुरलीधर रावजी डोळस<br>सर्व्हे नं.४६, बी. टी. कवडे रोड, भाग्यश्री नगर,<br>झेंडे वस्तीसमोर, घोरपडी गाव, पुणे-४११ ०३६ | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **जन माहिती अधिकारी तथा** | निवासी नायब तहसीलदार, जुन्नर<br>ता. जुन्नर, जि. पुणे | उत्तरवादी |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | तहसीलदार, जुन्नर<br>ता. जुन्नर, जि. पुणे | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | २९५२ / पुणे |
| २ | **सुनावणीची तारीख** | २८.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. मुरलीधर रावजी डोळस<br>सर्व्हे नं.४६, बी. टी. कवडे रोड, भाग्यश्री नगर,<br>झेंडे वस्तीसमोर, घोरपडी गाव, पुणे-४११ ०३६ |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | निवासी नायब तहसीलदार, जुन्नर<br>ता. जुन्नर, जि. पुणे तर्फे प्रतिनिधी श्री. पी.पी.पातुर्डे |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २६.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २८.५.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

वारस नोंद प्रकरणी आपल्याला अथवा आपल्या वडिलांना नोटिसा दिलेल्या नाहीत. फेरफाराची प्रत दिलेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. मुरलीधर रावजी डोळस यांनी केली. संबंधित

प्रकरणातील सर्व कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास देण्यात आल्या आहेत. फेरफाराबाबत त्यांचा आक्षेप असल्यास तो माहितीच्या अधिकारातील निर्णयाचा विषय नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, जुन्नर, जि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. पी. पी. पातुर्डे यांनी केले. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जुन्नर, जि. पुणे यांनी प्रथम अपिलावर दिलेल्या आदेशात या संदर्भातील सर्व वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, जुन्नर, जि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. पी. पी. पातुर्डे यांनी केले.

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जुन्नर, जि. पुणे यांनी दिलेला निर्णय स्वयंस्पष्ट आहे. तथापि अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित प्रकरणातील मंडल अधिकाऱ्यांच्या अहवालाची प्रत जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, जुन्नर, जि. पुणे यांनी निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 24 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| श्री. मुरलीधर रावजी डोळस<br>सर्व्हे नं.४६, बी. टी. कवडे रोड, भाग्यश्री नगर,<br>झेंडे वस्तीसमोर, घोरपडी गाव, पुणे-४११ ०३६ | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **जन माहिती अधिकारी तथा** | निवासी नायब तहसीलदार, जुन्नर<br>ता. जुन्नर, जि. पुणे | उत्तरवादी |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | तहसीलदार, जुन्नर<br>ता. जुन्नर, जि. पुणे | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | २९५२/ पुणे |
| २ | **सुनावणीची तारीख** | २८.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. मुरलीधर रावजी डोळस<br>सर्व्हे नं.४६, बी. टी. कवडे रोड, भाग्यश्री नगर,<br>झेंडे वस्तीसमोर, घोरपडी गाव, पुणे-४११ ०३६ |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | निवासी नायब तहसीलदार, जुन्नर<br>ता. जुन्नर, जि. पुणे तर्फे प्रतिनिधी श्री. पी.पी.पातुर्डे |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २६.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २८.५.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

वारस नोंद प्रकरणी आपल्याला अथवा आपल्या वडिलांना नोटिसा दिलेल्या नाहीत. फेरफाराची प्रत दिलेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. मुरलीधर रावजी डोळस यांनी केली. संबंधित

प्रकरणातील सर्व कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास देण्यात आल्या आहेत. फेरफाराबाबत त्यांचा आक्षेप असल्यास तो माहितीच्या अधिकारातील निर्णयाचा विषय नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, जुन्नर, जि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. पी. पी. पातुर्डे यांनी केले. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जुन्नर, जि. पुणे यांनी प्रथम अपिलावर दिलेल्या आदेशात या संदर्भातील सर्व वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, जुन्नर, जि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. पी. पी. पातुर्डे यांनी केले.

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जुन्नर, जि. पुणे यांनी दिलेला निर्णय स्वयंस्पष्ट आहे. तथापि अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित प्रकरणातील मंडल अधिकाऱ्यांच्या अहवालाची प्रत जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, जुन्नर, जि. पुणे यांनी नि:शुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

पुणे
दि. 24 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

ॲड.विकास जोशी
साई सदन, फ्लॅट नं.२९,
चौथा मजला, पुण्याई नगर,
धनकवडी, पुणे-४३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक,**
नगररचना,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी नगर रचनाकार,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९७९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२/०६/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>ॲड.विकास जोशी<br>साई सदन, प्लॅट नं.२९, चौथा मजला, पुण्याई नगर,<br>धनकवडी, पुणे-४३<br>**जन माहिती अधिकारी नगर रचनाकार,**<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८<br>श्री.प्रशांत भालचंद्र शिंपी | |

| | | |
|---|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक,**<br>नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>पिंपरी, पुणे-१८<br>श्री.अविनाश भालचंद्र पाटील | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६/०९/२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७/०९/२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४/१०/२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०/१२/२००८ |
| ८ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे चिंचवड येथील स्मशानभूमी संदर्भातील माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता ॲड.विकास जोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२२/०६/२००६ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता श्री.जोशी यांच्या माहिती-मागणी अर्जाच्या अनुषंगाने त्यांना एकूण १३ कागदपत्रांच्या छायाप्रती समक्ष उपलब्ध करुन दिल्या असल्याचे व त्यामुळे अपिलार्थींचे समाधान झाले असल्याने अपील निकाली काढण्यात यावे, असे सुनावणीच्या वेळी उभय बाजूंनी सांगितले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 23 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. प्रकाश दत्तात्रय मांगले
दत्तप्रभा, ४२, विवेक सोसायटी, पद्मावती, पुणे-९ .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस उपायुक्त,
वाहतूक शाखा, पुणे .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त,
वाहतूक शाखा, पुणे शहर, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २५.५.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता :** श्री. प्रकाश दत्तात्रय मांगले<br>दत्तप्रभा, ४२, विवेक सोसायटी, पद्मावती, पुणे-९<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त,<br>वाहतूक शाखा, पुणे शहर, पुणे-१ तर्फे प्रतिनिधी श्री. धनंजय लोमटे | |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

एकतर्फी वाहतुकीच्या मार्गावर नियमभंगाबद्दल किती लोकांवर कारवाई केली, याची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाययक पोलिस आयुक्त, वाहतूक शाखा, पुणे शहर यांनी दिली नाही.

अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपायुक्त, वाहतूक शाखा, पुणे यांनी त्यांचे उत्तर योग्य ठरविले. वाहतुकीच्या अनुषंगाने आपण पाठविलेल्या अनेक पत्रांवर योग्य कारवाई पोलिसांनी केली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. प्रकाश दत्तात्रय मांगले यांनी केले.

वाहतूकविषयक नियमभंगाबद्दल रस्तेनिहाय माहिती ठेवली जात नाही. संपूर्ण शहराची माहिती एकत्रित असते, त्यामुळे एका रस्त्याबाबतची माहिती देता येणार नाही. अर्जातील त्यांच्या अन्य माहितीबाबत त्यांना उत्तर देण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, वाहतूक शाखा, पुणे शहर यांचे प्रतिनिधी श्री. धनंजय लोमटे यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, वाहतूक शाखा, पुणे शहर व अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपायुक्त, वाहतूक शाखा, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. तथापि सदाशिव पेठेतील उंबऱ्या गणपती चौक ते एस.पी. कॉलेज मार्गावर एकेरी वाहतूक असून नियमाचा भंग केल्याबद्दलच्या कारवाईची १ जून ते ३० जून २०१० पर्यंत स्वतंत्र नोंद ठेवावी व अपीलकर्त्यास ती पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. ३०.७.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

पुणे
दि. 30 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. तुषार बाळासाहेब शिवले
नेताजी चौक, सासवड, जॉली मित्र मंडळ, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
पुरंदर तहसील कार्यालय, ता.पुरंदर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
पुरंदर तहसील कार्यालय, ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
पुरंदर तहसील कार्यालय, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.देवदत्त ठोंबरे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
पुरंदर तहसील कार्यालय, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.एस.व्ही.चंदनशिवे

| | |
|---|---|
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. तुषार बाळासाहेब शिवले यांनी सन १९२४ सालापासूनचे वारस नोंद प्रकरणातील माहिती मागितली होती. उपलब्ध असलेल्या माहितीबाबत शुल्क कळविले. प्रती पाहून मग शुल्क भरू, असे श्री.शिवले यांनी सांगितले. संबंधित प्रकरणातील अर्ज, जाबजबाब उपलब्ध नसल्याचे त्यांना कळविले. त्यांनी शुल्क भरलेले नाही व प्रथम अपिलाच्या सुनावणीलाही ते उपस्थित नव्हते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुरंदर तहसील कार्यालय, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.एस.व्ही.चंदनशिवे यांनी केले. त्यांनी केलेली कार्यवाही रास्त असून उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती आवश्यक असल्यास शुल्क भरून अपीलकर्ता यांना प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. हेमंत मधुकर हिरवे
११७२/२, महात्मा गांधी मार्ग,
शिंपी आळी, कॅम्प,
पुणे-१

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,**
पुणे विभाग, ढोले पाटील रोड,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,**
श्री संत नामदेव शिंपी समाज,
श्री राम मंदिर, महात्मा गांधी मार्ग,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०२२/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** राम मंदिर दुकान नं.१ चे भाडेकरु श्री.कोचर यांच्या भाडेपावती हस्तांतरणाबाबत, तसेच राम मंदिर इमारत ही धोकादायक अवस्थेत असल्याने ती कोणासही भाडयाने देऊ नये, यासंदर्भात मंदिर समितीने केलेल्या ठरावाची प्रत तदनुषंगीक एकूण ४ मुद्दे | |

**विवेचन**

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण'

ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता श्री. हेमंत मधुकर हिरवे यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. तसेच सहायक धर्मादाय आयुक्त, पुणे यांनी दिलेल्या निर्णयातही त्याबाबतची पुष्टी होत नाही. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
दि :- 18 JUN 2010

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीपाद रामचंद्र यावलकर
फ्लॅट क्र.१००३, दहावा मजला, धवलगिरी, बाणेर रोड, पाषाण, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर(४), पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री धवलगिरी सहकारी गृहनिर्माण
संस्था मर्यादित, स.नं.१३/१/७, १३/१/१४, पाषाण, बाणेर रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०८ / २०१० / पुण |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.श्रीपाद रामचंद्र यावलकर
फ्लॅट क्र.१००३, दहावा मजला, धवलगिरी, बाणेर रोड, पाषाण, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर(४), पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.एम.एस.जाधवर

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री धवलगिरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,
स.नं.१३/१/७, १३/१/१४, पाषाण, बाणेर रोड, पुणे श्री.एस.आर.यावलकर

| | |
|---|---|
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

श्री.परेश वसंत गुगळे हे आमच्या श्री धवलगिरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या संस्थेचे सभासद असून काही माहिती त्यांना दिली. तथापि सहकारी गृहनिर्माण संस्थेला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असे त्यांना कळविले. काही माहिती अन्य सभासदांच्या संदर्भात व्यक्तिगत स्वरूपाची होती, त्यामुळे ती दिली नाही. मात्र माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(४), पुणे यांनी दिला, तो बेकायदेशीर असून रद्द करावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.श्रीपाद रामचंद्र यावलकर यांनी केली.

श्री धवलगिरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या गृहनिर्माण संस्थेला कोणतेही शासकीय अनुदान व सवलत नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(४), पुणे श्री.एम.एस.जाधवर यांनी नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(४), पुणे यांनी यांनी दिलेला निर्णय नियमबाह्य आहे, म्हणून रद्द करण्यास पात्र ठरतो.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(४), पुणे यांचा निर्णय रद्द करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

डॉ. सुनालिनी सत्तूर
द्वार ४अ, शिवम सहकारी गृहरचना संस्था,
शिवरकरमार्ग, वानवडी, पुणे-४११ ०४० .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त, विभाग क्र. ४,
टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय, .. उत्तरवादी
पुणे महानगरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी,
हडपसर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०९ /२०१० + ३१० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २६.५.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्त्या** - डॉ. सुनालिनी सत्तूर
द्वार ४अ, शिवम सहकारी गृहरचना संस्था,
शिवरकरमार्ग, वानवडी, पुणे-४११ ०४०

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त, विभाग क्र. ४,
टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. एम. गरड

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी,
हडपसर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे
तर्फे प्रतिनिधी श्री. एस.एस. पाटील

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

आपल्या घरासमोरील मोकळ्या जागेतील प्रचंड कचऱ्यामुळे अनारोग्यकारक परिस्थिती निर्माण झाली आहे, त्याबाबत वारंवार तक्रार करुनही संबंधितांवर कारवाई केली जात नाही. एकदा तेथे स्वच्छता करण्यात आली, परंतु कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. गेली १० वर्षे आपण या प्रश्नाचा पाठपुरावा करीत असून मोकळ्या जागेभोवती पत्र्याची कायम स्वरूपी तटबंदी केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. महानगरपालिकेने तशी कार्यवाही केली पाहिजे, अशी मागणी अपीलकर्त्या डॉ. सुनालिनी सत्तूर यांनी केली.

डॉ. सत्तूर यांच्या तक्रारीनुसार शोध घेतला असता, मिळकतदार आढळून न आल्यामुळे संपूर्ण भूखंड महानगरपालिकेने स्वच्छ करून घेतला. दरम्यानच्या काळात मिळकतधारकांचा आढळ होऊन तेथे खाजगी सहकारी गृहरचना संस्था असल्याचे स्पष्ट झाले. त्यांना सूचना देण्यात आल्या असून संबंधित संस्थेच्या पदाधिकाऱ्यांविरूध्द महानगरपालिकेने न्यायालयात खटला दाखल केला आहे. डॉ. सत्तूर यांची तक्रार खाजगी सोसायटीमधील अंतर्गत प्रश्नाबाबत असून महानगरपालिकेच्या कक्षेतील कार्यवाही करण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अधिकारी, हडपसर, पुणे महानगरपालिका यांचे प्रतिनिधी श्री. एस.एस. पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, विभाग क्र.४, पुणे महानगरपालिका श्री. एम. गरड यांनी केले.

अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि महानगरपालिकेने तक्रारीची दखल घेऊन खटला दाखल केला आहे. मात्र आरोग्यविषयक समस्या लक्षात घेऊन कायम स्वरूपी उपाययोजना त्वरेने होणे आवश्यक आहे, म्हणून त्याबाबतच्या उपाययोजनेची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. 30 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ